नियमित दिवाणी दावा क्र. ३३/२०२२
निशाण क्र. ९५ लगत

**<u>प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०१ स्वतः प्रतिवादी क्रमांक ०१ अमित रंजनीकांत खातू यांचा उलटतपास शपथेवर, वादीतर्फे विधीज्ञा श्रीमती बी. एस. मुरुडकर यांचेकडून</u> –**

**१३**. हे म्हणणे खरे आहे की, वादी माझी आत्या लागते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या बाकी दोन आत्या कल्पना व कुंदा या दोघी मयत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मयत कल्पना व कुंदा यांना कोणीही वारस नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, वादीचा विवाह सन १९५८ मध्ये झाला. हे म्हणणे खरे नाही की, वादी या त्यांच्या सासरी वाखेड, राजापूर येथे राहायच्या. हे म्हणणे खरे आहे की, वादीचे पती सन १९९० मध्ये मयत झाले.

**१४**. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील रंजनीकांत हे पूर्वीपासून पुणे येथे नोकरीस राहण्यास होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे चुलते अनंत हे व्यवसायानिमित्त त्यांच्या कुटूंबीयासमवेत मुंबई येथे राहण्यास होते. हे म्हणणे खरे आहे की, चुलते वसंत हे सन २००५ मध्ये अविवाहीत मयत झाले आहेत. हे मला सांगता येणार नाही की, माझे आजोबा शंकर खातू यांनी सन १९४० मध्ये घर क्रमांक ६–ब बांधले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे आजोबा सन १९६८ मध्ये मयत झाले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर माझी आजी गंगाबाई व चुलत वसंत असे दोघेच तेथे राहायला होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे चुलते वसंत हे गावी शेती करायचे.

**१५**. फेरफार क्रमांक १०२४ मी पाहिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामध्ये शंकर सदाशिव खातू मयत असून वारस बायको – गंगाबाई, मुलगे – अनंत, वसंत, रंजनीकांत व मुली – विभावरी गजानन शेटये, कल्पना बाळकृष्ण शेटये व कुंदा शंकर खातू असे एकत्रात राहतात, असे त्यात नमूद आहे. हे मी सांगू शकत नाही की,

माझ्या कैफियतमध्ये नमूद केल्याप्रमाणे ''सदर विभावरी, कल्पना व कुंदा या बहीनींनी त्यांचे भाऊ अनंत, वसंत व रंजनीकांत यांच्या लाभात हक्क सोडल्याचे'' सदर फेरफारमध्ये नमूद नाही. हे मला माहिती नाही की, ''विभावरी, कल्पना व कुंदा यांनी अनंत, वसंत व रंजनीकांत यांच्या लाभात हक्कसोडपत्र करुन दिले होते किंवा नाही''. हे म्हणणे खरे आहे की, तसा हक्क सोडपत्राचा कागद प्रस्तुत प्रकरणात मी दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या कैफियतमध्ये कथन केल्याप्रमाणे ''चुलते वसंत यांनी मृत्यूपत्र करुन ठेवले होते'' असे दाखविणारा कागदोपत्री पुरावा मी दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, चुलते वसंत यांनी कधी, कोठे व कोणासमक्ष मृत्यूपत्र करुन ठेवले होते, याचे सविस्तर वर्णन कैफियतध्ये नमूद नाही.

१६. ***प्रश्नः*** *वसंत यांनी मृत्यूपत्र केलेलेच नसल्यामुळे त्याचे वर्णन कैफियतध्ये नाही, हे खरे का ?*

***उत्तरः*** *मला सांगता येणार नाही.*

१७. हे म्हणणे खरे आहे की, अभिजीत अनंत खातू हा माझा चुलत भाऊ आहे. हे म्हणणे खरे आहे की, अभिजीत खातू हा वादी व तिच्या मुलीचा सर्व खर्च करीत असल्याची बाब दाखविणारा कागदोपत्री पुरावा मी अभिलेखात दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. ०२ व ०४ यांच्या मेहरबानीने वादी व तिची मुलगी सोनवडे येथील घरी राहत असल्याचे व प्रतिवादी क्र. ०२ व ०४ हे वादी व तिच्या मुलीचा खाण्या–पिण्याचा खर्च करीत असल्याचे माझ्या कैफियतमध्ये मी खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सोनवडे येथील घर क्रमांक ६–अ, ६–ब व ६–क या घरातील मागील खोलीत वादीला विनामोबदला लायसन्सी म्हणून राहायला दिल्याचे दाखविण्यासाठी मी कागदोपपत्री पुरावा दाखल केला नाही. हे म्हणणे

खरे नाही की, वादीला दावा मिळकतीमध्ये हिस्सा मिळू नये म्हणून मी खोटी कैफियत सादर केली आहे. हे मला सांगता येणार नाही की, सोनवडे येथील घर वादीच्या वडीलांनी बांधलेले असल्यामुळे त्या घरामध्ये वादीचा कायदेशीर हक्क आहे किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रातील मजकूर खोटाच नमूद केला आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.07.18 18:15:04 +0530

**(श्रीमती आर. आर. कुलकर्णी)**

दि.१८/०७/२०२५ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, देवरुख

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S. A. Bhale |
| Court name | : | Civil Judge, J. D. and J.M.F.C., Devrukh. |
| Date | : | 18/07/2025 |
| Order signed by the presiding officer on | : | 18/07/2025 |
| Order uploaded on | : | 18/07/2025 |